आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
९ ऑगस्ट २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याची हवाई दलप्रमुखांची माहिती

- दिवाळी आणि छठ पूजेच्या काळात परतीच्या तिकिटात २० टक्के सूट देण्याचा भारतीय रेल्वेचा निर्णय

- विविध निकष पूर्ण न करू शकलेल्या ३४५ पक्षांची मान्यता निवडणूक आयोगाकडून रद्द

- दिल्लीतल्या जैतपुरा भागात भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू

**आणि**

- रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन १५ ऑगस्ट रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अमेरिकेत भेट घेणार

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याची माहिती हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी आज बेंगळुरू इथं एका व्याख्यानात दिली. यात पाकिस्तानी हवाई दलाच्या पाच, तर एका सूचना आणि नियंत्रण विमानाचा समावेश असल्याचंही त्यांनी सांगितलं. ही कारवाई जवळपास ३०० किलोमीटर अंतरावरून केल्याचं सांगून जमिनीवरून हवेत मारा करण्याचा हा उच्चांक असल्याचंही सिंह यांनी नमूद केलं. शाहबाज जेकोकाबाद हवाई तळावर भारतानं केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात काही विमानांचं नुकसान झाल्याचंही ते म्हणाले. भारताने या कारवाईदरम्यान अतिशय अचूक हल्ले केले आणि तिन्ही सशस्त्र दलांच्या समन्वयाचं दर्शन घडवलं, तसंच हवाई संरक्षण यंत्रणांनीही उत्तम कामगिरी केली, असं मत सिंह यांनी मांडलं.

**<><><><>**

आर्थिक वर्ष २०२४-२५ मधे देशाचं संरक्षण उत्पादन एक लाख ५१ हजार कोटी रुपयांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचलं आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात १८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. संरक्षण औद्योगिक क्षेत्र बळकट होत असल्याचं त्यांनी नमूद केलं आणि संरक्षण उत्पादन विभाग, तसंच इतर संबंधितांची प्रशंसा केली.

**<><><><>**

देशाचा संरक्षण क्षेत्रातली निर्यात गेल्या वर्षी २३ हजार कोटी रुपये इतकी होती, येत्या दोन ते तीन वर्षांत ती दुप्पट होईल, असा विश्वास संरक्षण, संशोधन आणि विकास विभागाचे सचिव आणि DIAT च्या शिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत व्यक्त केला. पुण्याच्या डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी अर्थात DIAT चा १४ वा पदवीदान समारंभ कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यानंतर ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. भारतीय संरक्षण सामग्रीला मध्य पूर्वेकडचे देश, आफ्रिका आणि दक्षिण आशियाई देशांमध्ये मागणी असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

दिवाळी आणि छठ पूजा या सणासुदीच्या दिवसांत परतीचं रेल्वे तिकीट काढणाऱ्यांना त्या तिकिटात २० टक्के सूट देण्याचा निर्णय भारतीय रेल्वेनं घेतला आहे. ‘राउंड ट्रिप पॅकेज’ अंतर्गत दोन्ही बाजूच्या प्रवासाचं आगाऊ तिकीट घेतल्यावरच ही सवलत लागू होईल, तसंच यासाठी जाताना आणि येतानाचे प्रवासी तेच असणं गरजेचं आहे, असं रेल्वे मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या योजनेअंतर्गत आरक्षित केलेलं तिकीट रद्द केलं, तर त्याचा परतावा दिला जाणार नाही. यासाठीचं आरक्षण १४ ऑगस्टपासून सुरू होणार आहे.

**<><><><>**

विविध निकष पूर्ण न करू शकलेल्या ३४५ पक्षांची मान्यता निवडणूक आयोगानं आज रद्द केली. गेल्या सहा वर्षांमध्ये ज्या पक्षांनी एकही निवडणूक लढवलेली नाही आणि ज्यांच्या कागदपत्रात दिलेल्या पत्त्यांवर त्यांची कार्यालयं आढळून आली नाहीत, अशा पक्षांची मान्यता निवडणूक आयोगानं काढून घेतली. त्यामुळे आता देशात २ हजार ५२० नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष राहिले आहेत, तसंच सहा राष्ट्रीय आणि ६७ प्रादेशिक पक्ष आहेत निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातला महत्त्वाचा अंक ठरलेल्या काकोरी कटाच्या शताब्दीनिमित्त यातल्या हुतात्म्यांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली. वसाहतवादी ब्रिटीश सत्तेनं भारतीयांवर कर लादून त्यांचं शोषण चालवलं होतं. त्याला विरोध करण्यासाठीची जनभावना या घटनेत उफाळून आली, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर नमूद केलं. ९ ऑगस्ट १९२५ या दिवशी काकोरी रेल्वे स्थानकाजवळ हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या क्रांतिकारकांनी धावती रेल्वेगाडी रोखून सरकारी खजिना लुटला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. या शूर स्वातंत्र्यसैनिकांचा देश कायम ऋणी राहील, असं त्यांनी समाजमाध्यमावर नमूद केल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या एका दिवसाच्या कर्नाटक दौऱ्यावर जाणार असून तीन वंदेभारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. यात अजनी-पुणे, केएसआर बेंगळुुरु-बेळगाव आणि श्री माता वैष्णोदेवी कटरा-अमृतसर अशा तीन वंदे भारत गाड्यांचा समावेश आहे. त्यानंतर ते बेंगळुरू मेट्रोशी संबंधित विविध विभागांचं लोकार्पण आणि पायाभरणीही करतील, तसंच एका सभेला संबोधित करतील. नागपूरहून पुण्याला जाणारी अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी

असून ८८१ किमी अंतर कापणारी ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत असेल.

**<><><><>**

दिल्लीतल्या जैतपुरा भागात आज मुसळधार पावसानं भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २ मुलं आणि एका महिलेचा समावेश आहे. मृतांपैकी बहुतेकजण स्थलांतरित कामगार आहेत. दिल्लीत काल रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळं अनेक भागात पाणी साचून जनजीवन विस्कळीत झालं. यामुळं सव्वाशेहून अधिक विमानांचं उड्डाण उशिरानं झालं.

**<><><><>**

तामिळनाडूत विरूधूनगर जिल्ह्यात वेम्बकोट्टाई इथं आज एका फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात तीनजण ठार झाले, तर एकजण गंभीर जखमी झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इथल्या एका घरात फटाके तयार करत असताना अचानक स्फोट झाला आणि आगीचे लोळ पसरले. ही आग झपाट्यानं पसरून अर्धवट तयार झालेल्या फटाक्यांचाही स्फोट झाला. या दुर्घटनेत इमारतीचंही मोठं नुकसान झालं. गेल्या महिनाभरातली अशा प्रकारची ही चौथी घटना आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरच्या कुलगाममध्ये दहशतवाद्यांविरुद्ध गेल्या नऊ दिवसांपासून सुरु असलेल्या लष्करी कारवाईदरम्यान आज सकाळी एका दहशतवाद्याला भारतीय जवानांनी कंठस्नान घातलं. या कारवाईत दोन जवान शहीद, तर अनेकजण जखमी झाले आहेत. या परिसरात ८ दहशतवादी लपून बसल्याची खबर मिळाल्यावरुन शोध मोहीम राबवण्यात येत आहे.

**<><><><>**

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यात ढगफुटीमुळे झालेल्या दुर्घटनेतून आतापर्यंत १ हजाराहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. घरांचं नुकसान झालेल्या नागरिकांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मृतांच्या वारसांनाही ५ लाख रुपये दिले जाणार आहेत. याशिवाय प्रभावित नागरिकांचं पुनर्वसन आणि रोजगाराचे पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी ३ जणांची समितीही सरकारनं स्थापन केली आहे. लष्करासह राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती दलाचे जवान स्थानिक प्रशासनाच्या मदतीनं बचाव कार्य राबवत आहेत.

**<><><><><>**

केनियामध्ये बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात किमान २५ जणांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी झाले. अंत्यसंस्कार आटोपून परतत असताना वळणावर चालकाचं बसवरचं नियंत्रण सुटल्यानं खोल खड्ड्यात बस पडल्यानं ही दुर्घटना घडली.

**<><><><><>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन येत्या १५ ऑगस्ट रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत. अमेरिकेत अलास्कामध्ये ही भेट होईल आणि या बैठकीत युक्रेन युद्धावर चर्चा होईल, अशी घोषणा ट्रम्प यांनी केली. रशियानंही याला दुजोरा दिला आहे. या भागात शांतता नांदण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याची तयारी युक्रेननं दाखवली आहे. या युद्धावर कुठलाही तोडगा काढताना त्यात युक्रेनचा समावेश असावा असं मत युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी मांडलं. गेल्या साडेतीन वर्षांपासून सुरू असलेलं हे युद्ध थांबवायचं असेल, तर दोन्ही देशांना त्यांच्या ताब्यातले काही भूभाग परस्परांना द्यावे लागतील, असे संकेत ट्रम्प यांनी दिले आहेत.

**//<><><><><>//**